महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १४४२(१)(४)/म.वि.प./२०२१/तेवीस दिनांक : १२ ऑक्टोबर, २०२२.

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-** पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा- २०२१
गुण, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत

**संदर्भ:-** अधिसूचना क्र.५२/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा-२०२१ चा निकाल दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२.सदर निकालाद्वारे शारीरिक चाचणीसाठी अर्हताप्राप्त न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील 'View' अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणी करीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेआवश्यकआहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉग-इन करावे.

(३) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(४) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करून 'Save' बटणवर क्लिक करावे.

(५) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणी करीताची सदर वेबलिंक दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येतआहे.

४.उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणी करीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडी वर संपर्क साधता येईल.

दिनांक : १२ ऑक्टोबर, २०२२
ठिकाण : मुंबई

उपसचिव (परिक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग